**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२०/२०२०-२१/०८/वेतनपथक, पुणे दिनांक - ०६ नोव्हेंबर, २०२०

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - १. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणे.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत.**

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत.**

**४. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव व इतर बाबींमध्ये बदल करणे.**

**१. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणेबाबत -**

या विभागाच्या अधिपत्याखालील ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये नव्याने कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत व त्यांची वेतननिश्चिती सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग पुणे यांनी करुन त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे त्यांच्या टेम्प्लेट ४ ला मान्यता देण्याचे काम या कार्यालयामध्ये **दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत** करण्यात येणारे आहे. तरी ज्या महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये शासन मान्य पदावर कर्मचा-यांच्या नव्याने नियुक्त्या झालेल्या आहेत फक्त अशाच महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठातील या कामकाजाशी संबंधीत कर्मचा-यांनी त्यांची माहिती टेम्प्लेट ४ मध्ये भरुन या कार्यालयास फॉरवर्ड करावी व अशा नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या नियुक्तीबाबतच्या सर्व

कागदपत्रांसह आणि टेम्प्लेट ४ सह **दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत नेस वाडिया महाविद्यालय, पुणे येथे उपस्थीत रहावे.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत -**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये ब-याच महाविद्यालयांमधील शासन मान्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा बदल्या झालेल्या आहेत. त्यामुळे अशा सर्व कर्मचा-यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन त्याप्रमाणे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये योग्य ते बदल करुन घेण्याचे काम **नेस वाडिया महाविद्यालय, पुणे येथे दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत** करण्यात येणार आहे. त्यासाठी खालील विवरणपत्रामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती **payunit@jdhepune.info** या इमेल आयडी वर Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये पाठवावी. **तसेच बदलीबाबतची सर्व कागदपत्रे पीडीएफ मध्ये इमेल सोबत जोडण्यात यावीत. तसेच संबंधीत कर्मचा-यांना एचटीई सेवार्थ प्रणालीमधून Detach करण्यात यावे. तरी वरील बाब लक्षात घेऊन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह उपस्थीत रहावे.**

**माहे नोव्हेंबर, २०२० या महिन्यामध्ये झालेल्या बदलींची माहिती दर्शविणारे विवरणपत्र**

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

**अ) आपल्या महाविद्यालयामधून इतर महाविद्यालयांमध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designa tion | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Relieving | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**ब) इतर महाविद्यालयांमधून आपल्या महाविद्यालयामध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designa tion | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Joining | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत.**

ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कॅस मान्य केल्यामुळे/पदोन्नती झाल्यामुळे अथवा इतर कोणत्याही बाबीमुळे वेतननिश्चिती/सुधारित वेतननिश्चिती झालेली आहे व त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे यामुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे वेतनामध्ये फरक होत असल्यास त्या अनुषंगानेची माहिती खालील विवरणपत्रामध्ये **दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत नेस वाडिया महाविद्यालय, पुणे** येथे सादर करावी.

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Reason |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**४. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव व इतर बाबींमध्ये बदल करणे -**

ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतन/जन्मतारीख/सेवानिवृत्तीची तारीख या बाबींव्यतिरिक्त इतर काही बाबींमध्ये उदा. नावामध्ये/बँक खाते क्रमांकामध्ये इ. बदल करावयाचे असल्यास अशा बदलांना मान्यता देण्याचे कामदेखील **दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत करण्यात येणार आहे.** तरी या अनुषंगाने या पूर्वी दिलेल्या सूचना विचारात घेऊन योग्य ते बदल एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये करुन ते या कार्यालयास फॉरवर्ड करण्यात यावेत.

वरील बाबी लक्षात घेऊन ज्या महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये वरील बाब १ ते ४ च्या अनुषंगाने काम असल्यास त्यांनी **दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत नेस वाडिया महाविद्यालय, पुणे येथे उपस्थीत रहावे.**

**सही/-**
(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे